**प्रसिध्दीपत्रक**

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

जा.क्र./ पोउपआ / वाह / 746 /२०२४ पुणे दिनांक - 31 /०१/२०२४

ज्याअर्थी पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका,इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे **अंतिम आदेश** निर्गमित करीत आहे.

" सदर ठिकाणी यापुर्वी पार्कीगबाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील "

<u>चतु:श्रृंगी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,</u>

- **चौंधे पार्क समोरील वास्तु सुंदर सहकारी गृहरचना गेट नं. १ चे डाव्या व उजव्या बाजूस १० मीटर पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस नो पार्कीग करण्यात येत आहे.**
- **एन्क्लेव बिल्डींग समोरील गेट नं. २ चे डाव्या व उजव्या बाजूस १० मीटर पर्यत रस्त्याच्या दोन्ही बाजूस नो पार्कीग करण्यात येत आहे.**

( शशिकांत बोराटे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

प्रति,
**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २ पुणे शहर.**
२. **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
   २/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३. प्रभारी अधिकारी, **चतु:श्रृंगी** वाहतुक विभाग, पुणे शहर.
   २/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणे फलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.
४. **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
   २/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.
५. **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
   २/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.
६. **मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे
   २/-सदर ठिकाणी वरीलप्रमाणे फलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.

प्रति, **व्यवस्थापक,** येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे
२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.

Scanned with OKEN Scanner